# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र-१२८ दिनांक - ०१/०४/२०२४

## ८०,०००/- रू किंमतीचा ४ किलो गांजा नावाचा अंमली पदार्थ पकडण्यास काशिमिरा पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.

मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालय परिसरात अंमली पदार्थ विक्री करणारे तसेच बाळगणारे व्यक्तींचा शोध घेवुन त्यांचेविरूध्द कारवाई करणेबाबत मा. वरीष्ठांनी वेळोवेळी सुचना दिलेल्या होत्या

त्याअनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, सहा. पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगार वॉच पेट्रोलिंग फिरत असताना मुंबई अहमदाबाद महामार्गालगत मुंबईकडे जाणारे वाहिनीवर मन ओपस बिल्डिंग जवळील पडक्या घराजवळ काशिमिरा येथे १) पारस धिरूभाई चावडा, वय ३० वर्षे, रा. बी/१३, स्वप्न व्हिला, सत्यमनगर, कामरेज, जिल्हा सुरत गुजरात २) पुष्पक महेंद्रसिंग चौहान, वय २८ वर्षे, रा. रूम नं ५०३, भगवती अव्हेन्यु, सत्यमनगर, ननसाडरोड, कामरेज, जिल्हा सुरत, गुजरात हे इसम संशयास्पद रित्या वावरत असताना मिळून आले त्यांचे ताब्यात मिळून आलेल्या बॅगची दोन पंचासमक्ष झडती घेता त्यांचे ताब्यात ०४ किलो वजनाचा ८०,०००/- रू किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ व दोन मोबाईल असा एकुण १,०५,०००/- रू किंमतीचा मुद्देमाल मिळून आला असून तो जप्त करण्यात आला आहे.

नमुद आरोपींताना विरोधात काशिमिरा पोलीस ठाणे येथे गु रजि नं २२१/२०२४, एन.डी.पी.एस १९८५ चे कलम ८ (क), २० (ब), २९ दाखल करुन त्यांना गुन्हयात अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा तपास पोउपनिरी शिवाजी खाडे नेम काशिमिरा पोलीस ठाणे हे करीत आहेत.

वरील कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त सो., (परिमंडळ-१), डॉ. विजय मराठे, सहा.पोलीस आयुक्त सो., (मिरारोड विभाग), व.पो.नि/ राजेंद्र कांबळे, पो.नि समीर शेख (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनिरी शिवाजी खाडे, सहा.पो.उपनिरी पवार, सहा.पो.उपनिरी इगवे, पो.हवा मोहिले, पो.हवा सोनकांबळे, पो.हवा निलेश शिंदे, पो.हवा सतिश निकम, पो.अंम. रविंद्र कांबळे, पो.अंम.राजेंद्र सुर्यवंशी यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.


महाराष्ट्र पोलीस